आ.क्र.ई -1 / स.सा.बदल्या-2011 / 3493 /2011
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य पुणे
यांचे कार्यालय.
दिनांक 04/06/2011

विषयः- पोलीस बिनतारी संदेश विभागातील अधिकारी व कर्मचारी सर्वसाधारण बदल्या -2011
संदर्भः- महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणारे विलंबास प्रतिबंध अधिनियम-2005

******

संदर्भांधिन शासकीय अधिनियमान्वये पोलीस बिनतारी संदेश विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सर्व साधारण बदल्या -2011 चे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भांधिन अधिनियमातील तरतूदीनुसार सर्वसाधारण बदल्या हया माहे मे अखेर पर्यंत करण्याचे शासनाचे आदेश असल्याने बदल्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

तथापी आमचे असे निदर्शनास आले आहे की, पोलीस बिनतारी संदेश विभागातील काही अधिकारी व कर्मचारी हे बदलीच्या ठिकाणी हजर न होता त्यांचेकडून बदली आदेश रदद करण्यासाठी अथवा बदलीचे ठिकाण बदलून मिळण्यासाठी विनंती अर्ज परस्पर केले जातात. आता सर्व साधारण बदल्याच्या कार्यवाही मुदत संपलेली असल्याने व बदली ही वर्षभर चालणारी प्रक्रिया नसल्याने कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचारी यांचेकडून बदलीबाबतचे अर्ज प्राप्त झाल्यास सदर अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील, याची संबंधीत पोलीस बिनतारी संदेश विभागाच्या प्रभारी अधिकारी यांनी संबधित अधिकारी व कर्मचारी यांना समज देण्यात यावी.तसेच बदली संदर्भात अनेक अधिकारी / कर्मचारी या कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता वरिष्ठांची भेट घेण्यासाठी येत असतात. तरी यापुढे बदलीच्या अनुषंगाने कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचा-यास पूर्व परवानगी शिवाय वरिष्ठांची भेट अथवा आज्ञांकित कक्ष मिळणार नाही. याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. पुढील वर्षी ज्यावेळी सर्व साधारण बदल्याचे अनुषंगाने अर्ज मागविले जातील. त्यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी योग्य त्या मार्फतीने अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणारे विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 ची अंमलबजावणी त्वरीत करणे आवश्यक असल्याने संबधित घटक प्रमुखांनी पोलीस बिनतारी संदेश विभागातील बदली झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांना बदलीच्या ठिकाणी हजर राहणेसाठी कार्यमुक्त करावे. व पुर्तता अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

Sd/-
**( पि.पा.प्र.शर्मा )**
अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,
पुणे-8

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधिक्षक,
सर्व समादेशक रा.रा.पो.ब.गट

प्रतः-

पोलीस उप आयुक्त,बि.सं.मुंबई.
पोलीस अधिक्षक बि.सं. पश्चिम विभाग, पुणे / पूर्व विभाग, नागपूर
सर्व पोलीस उपअधीक्षक बि.सं./ सर्व सहा. पोलीस आयुक्त,बि.सं.
सर्व पोलीस निरीक्षक बि.सं.
भरती कक्ष (संकेत स्थळावर प्रसिध्दिसाठी )